ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील भाषांचे स्थान



**डॉ. रविकांत शिंदे**
मराठी विभाग, श्री शिवाजी महाविद्यालय, बार्शी
ता सोलापूर . जि ,बार्शी .

## प्रस्तावना :-

शिक्षणाचा मूलभूत गाभाहाभाषाशिक्षण आहे शिक्षणाचे माध्यम भाषा असते. लहान मुलांना प्राथमिक स्तरावरील शिक्षणमातृभाषेतून दिले जावे असा एक मतप्रवाह आहे. लहान मुलाला कोणतेही मूलभूत ज्ञान, त्यातील सैद्धान्तिक भाग योग्य आकलनासह आपल्या मातृभाषेतून अधिक सहज व प्रभावीपणे आत्मसात करता येऊ शकतो.हे आता जगभर अनेक अभ्यासांती सिद्ध झाले आहे. शिक्षण हे मातृभाषेतूनच दिले जाणे हे विद्यार्थ्यांच्या ज्ञानग्रहणासाठी महत्वाचे असल्यामुळे तशी तरतूद संविधानाच्या कलम ३५० अ मध्ये करण्यात आली आहे.

१९६८मध्ये पहिले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भारतात कोठारी आयोगाच्या शिफारशींचा आधारे लागू झाले. त्यात राष्ट्रीय एकात्मता, भाषिक अस्मिता आणि देशाची बहुभाषिकता लक्षात घेऊन सर्वप्रथम त्रैभाषिक भाषा धोरण स्वीकारण्यात आले आपल्या महाराष्ट्राने हे त्रैभाषिक धोरण तंतोतंत स्वीकारले १९८६च्या दुसऱ्या शैक्षणिक धोरणात त्रैभाषिक धोरण कोणताही बदल न करता कायम ठेवण्यात आले. नव्या २०२०च्या तिसऱ्या धोरणातही ते कायम आहे, पण त्यात काही सूक्ष्म बदल आहेत.

## नव्या शैक्षणिक धोरणातील भाषा विषयक प्रमुख तरतुदी

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात 'बहुभाषावाद आणि भाषेची सक्ती' या शीर्षकाखाली ४.११ ते ४.२२ या परिच्छेदांत भाषा धोरण पुरेशा विस्तृत प्रमाणात विशदकेले आहे. या भाषा धोरणाच्या प्रमुख शिफारशी पुढीलप्रमाणे आहेत

1. नव्या धोरणातही कोठारी आयोगाचे त्रैभाषिक धोरण कायम ठेवण्यात आले आहे. बहुभाषा विविधता जपण्यासाठी व राष्ट्रीय एकात्मतेसाठी यापुढेही त्रैभाषिक भाषासूत्र नव्या धोरणात कायम ठेवण्यात आले आहे
2. नव्या धोरणात किमान पाचव्या इयत्तेपर्यंत व शक्यतोवर आठव्या इयत्तेपर्यंत शिक्षणाचे माध्यम हे मातृभाषा म्हणजेच राज्यभाषा असले पाहिजे, यावर भर दिला आहे. त्या पलीकडेही शक्य आहे, तिथे स्थानिक भाषा शिकवली जावी.
3. विज्ञान-गणितासह सर्व विषयांची पाठयपुस्तके मातृभाषेत/राज्यभाषेत सुलभ आकलनासाठी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातील. तसेच द्विभाषीय अध्यापन-अध्ययन सामग्रीसह शिक्षकांना द्विभाषा पद्धती वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल त्यामुळे विद्यार्थी मातृभाषा व इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये विचार करण्यासाठी व बोलण्यासाठी सक्षमबनतील.
4. विद्यार्थ्यांचे सुरुवातीच्या दोन वर्षात म्हणजे पहिली व दुसरीमध्येलेखन व वाचन कौशल्य विकसित झाल्यानंतर इयत्ता तिसरीपासून पुढे इतर भाषांचे लेखन व वाचन शिकवले जाईल. त्यासाठी सर्व भाषांच्या शिक्षकांची मोठ्या संख्येने तरतूद करण्यात येईल
5. परिच्छेद ९.३(अ)मध्ये अशी शिफारस आहे की, प्रत्येक जिल्ह्यात किंवा जवळपास एक मोठे बहुशाखीय विद्यापीठ आणि महाविद्यालय असेल, ज्यांचे शिकवण्याचे किंवा कार्यक्रमांचे माध्यम स्थानिक भारतीय भाषा असेल

6. संस्कृत भाषा शालेय शिक्षणच्या सर्व स्तरांमध्ये, तसेच उच्चशिक्षणाचा एक महत्त्वाचा तसेच त्रिभाषा सूत्रात एक पर्याय म्हणून उपलब्ध असेल.
7. संस्कृत भाषेसोबत अभिजात भारतीय भाषा, पाली, पर्शियन व प्राकृत या भाषा व त्यांचे साहित्य विद्यार्थ्यांना ऑनलाइन मोड्युल्सद्वारे अनुभवात्मक व नावीन्यपूर्ण मार्गांनी उपलब्ध असतील.
8. माध्यमिक स्तरावर परदेशी भाषा उदा. कोरियन, थाई, फ्रेंच, स्पॅनिश, पोर्तुगीज आणि रशियन यांच्यासुद्धा संधी उपलब्ध करून दिल्या जातील.
9. भारतीय सांकेतिक भाषा - Indian Sign Language देशभर प्रमाणित केल्या जातील.

## भाषाधोरणाची चिकित्सा

कस्तुरीरंगन समितीच्या केंद्राने स्वीकारलेल्या भाषा धोरणावर एक सहज दृष्टीक्षेप टाकला तर हे भाषा धोरण भारतासारख्या बहुभाषिक व बहुसांस्कृतिक देशासाठी योग्य वाटू शकेल तसे ते बऱ्याच प्रमाणात आहे, पण बहुभाषिकता जपण्यासाठी अनेक भाषा शिकण्याचे फार अधिक ओझे विद्यार्थ्यांवर टाकले जात आहे, असे प्रथमदर्शनी वाटल्यावाचून राहत नाही. कुठल्याही धोरणाची प्रस्तुतता व स्वीकारार्यता ही तपशीलावर अवलंबून असते. कारण म्हणून आता तपशिलात जाऊन नव्या भाषा धोरणाची आपण १) योग्य विद्यार्थी व देशहित आणि २) अयोग्य न म्हणता अवाजवी व विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ओझे टाकणारे म्हणून अव्यवहार्य अशा दोन कसोट्यांच्या आधारे चिकित्सा करू या. त्याचेही भाग पाडून विवेचन करणे स्पष्टतेसाठी आणि दिशा दिग्दर्शन आणि महाराष्ट्र सरकारला अंमलबजावणीसाठी करावयाच्या शिफारशीसाठी आवश्यक आहे. ते पुढीलप्रमाणे-

## मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण

नव्या शैक्षणिक धोरणातील सर्वांत महत्त्वाचा स्वागतार्ह आणि स्वीकारार्ह भाग म्हणजे मातृभाषा/राज्यभाषेतून किमान आठवीपर्यंतच्या शालेय शिक्षणाचा आग्रह हा आहे. बहुभाषिकता महत्त्वाची असली तरी विषय, सैद्धान्तिक तत्त्वे व नियम यांचे आकलन हे मातृभाषेत मुलास अधिक सहजतेने व नीटपणे होऊ शकते, हे कस्तुरीरंगन समितीने स्पष्टपणे मान्य केले आहे.

नव्या शैक्षणिक धोरणात असे स्पष्ट नमूद केले आहे की, लहान वयातले मूल म्हणजेच २ ते ८ वयोगटातील मुलं अनेक भाषा जलदगतीने आत्मसात करू शकते व अशी बहुभाषाकौशल्यता हे मुलांच्या ज्ञानात्मक आकलनासाठी फार उपयुक्त असते म्हणून नव्या शैक्षणिक धोरणातील किमान पाचवीपर्यंत व शक्यतो आठवीपर्यंत केवळ मातृभाषेतून शिक्षण देण्याची शिफारस महाराष्ट्राने उद्यासमजा स्वीकारली, तर ती फक्त मराठी माध्यमांच्या शाळांपुरतीच मर्यादित राहील कारण इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरूच राहणार आहेत "पुढील काही काळाचा विचार करता इंग्रजी व अन्य अमराठी भाषा व माध्यमांच्या शाळेत मराठीसह तीन भाषा शिकवणे अपरिहार्य आहे कारण तेथे इंग्रजी व हिंदी पहिल्यापासून शिकवल्या जातात, तेथील अमराठी भाषिक विद्यार्थ्यांना व इंग्रजी माध्यमातील बहुसंख्य मराठी भाषिक मुलांसह सर्व भाषिक विद्यार्थ्यांना मराठी भाषा राज्यात राहण्यासाठी, नोकरी व उद्योगधंद्यासाठी, महाराष्ट्राशी एकरूप होण्यासाठी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे महाराष्ट्राचे धोरण म्हणून शिकणे आवश्यक आहे सबब पहिलीपासून मराठी, हिंदी आणि इंग्रजी असे त्रैभाषिक धोरण या अपरिहार्यतेमुळे महाराष्ट्राने नवे शिक्षण धोरण लागू करताना स्वीकारणे माझ्या मते आवश्यक आहे"[१] सक्तीच्या मराठी कायद्याने २०२०पासून अमराठी भाषा माध्यमांच्या शाळांत इंग्रजी, हिंदी किंवा अन्य भाषांसोबत मराठी शिकवणे आता सुरू झाले आहे, मराठी भाषा व संस्कृतीच्या संवर्धनासाठी अत्यावश्यक आहे. महाराष्ट्रातील सर्व भाषा माध्यमांच्या शाळांमध्ये समान पद्धतीने पहिलीपासून मराठी, हिंदी आणि इंग्रजी त्रैभाषिक धोरण लागू करणे विद्यार्थ्यांच्या हिताचे राहील

महाराष्ट्राने नेहमीच व्यापक राष्ट्रहिताचा विचार केला आहे व हिंदीला मराठी माणसाचा कधीच विरोध राहिलेला नाहीय, म्हणून इंग्रजी प्रमाणे मराठी माध्यमांच्या शाळेतही हिंदी पहिलीपासून शिकवली जावी, असे त्रैभाषिक धोरण राज्याने नव्या शैक्षणिक धोरणांचा भाग म्हणून व थोडा विस्तार करून स्वतःच्या अधिकारात व स्व-राज्य हितासाठी लागू केले पाहिजे

## द्विभाषिक अध्यापन

नव्या शैक्षणिक धोरणात भाग दोनमध्ये जी वैशिष्ट्ये नमूद केली आहेत, त्यामध्ये विज्ञान व गणितासह सर्व विषयाची पाठ्यपुस्तके मातृभाषेत/राज्यभाषेत सुलभ आकलनासाठी निर्माण करून दिली जातील आणि द्विभाषीय अध्ययन-अध्यापन सामग्रीसह शिक्षकांना

विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी द्विभाषा पद्धती वापरण्यासाठी प्रोत्साहन दिले जाईल, असे नमूद केले आहे ही विद्यार्थी हिताच्या दृष्टीने फार सकारात्मक शिफारस आहे. यामुळे विद्यार्थी आपली मातृभाषा आणि इंग्रजीमध्ये विचार करण्यासाठी व बोलण्यासाठी सक्षम बनतील.

विज्ञान व गणितासाठी द्विभाषिक अध्ययन-अध्यापनाची शिफारस ही सेमी-इंग्लिशपेक्षा अधिक शास्त्रशुद्ध आहे पाचवी किंवा सातवीपासून द्विभाषिक अध्ययन-अध्यापनाची शिफारस लागू करणे अधिक फायदेशीर आहे.द्विभाषिक अध्ययन-अध्यापनासाठी मातृभाषेत म्हणजेच मराठीमध्ये स्वतंत्रपणे विज्ञान, गणित व अन्य विषयाची पाठ्यपुस्तके करण्याऐवजी द्विभाषिक पाठ्यपुस्तके निर्माण केली पाहिजेत. इंग्रजी व मराठीला समप्रमाणात महत्त्व आहे, हे विद्यार्थ्यांच्या मनावर सहजतेने बिंबवले जाईल व त्यांचा आजचा भाषिक न्यूनगंड कमी होईल व पुढे तो पूर्णपणे नाहीसा होईलद्विभाषिक पाठ्यपुस्तकामुळे विद्यार्थ्यांचे ज्ञानात्मक, संकल्पनात्मक व सैद्धांतिक बाबींचे आकलन परिपूर्ण व सहज सुलभ होईल. विज्ञान व गणिताचे काही सिद्धान्त इंग्रजी वाचून समजले नाहीत, तर तोच भाग लगेच मराठी वाचला तर त्या सिद्धान्ताचे पूर्ण आकलन होण्यास मदत होईल व पुन्हा इंग्रजी वाचून ते पक्के होईल.

## स्थानिक भाषेतून महाविद्यालयीन शिक्षण

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या परिच्छेद ९.३(अ)मध्ये 'प्रत्येक जिल्ह्यात किंवा जवळपास एक मोठे विद्यापीठ असेल, ज्यांचे शिकवण्याचे किंवा कार्यक्रमाचे माध्यम स्थानिक भारतीय भाषा असेल', अशी एक शिफारस आहे. ही शिफारस सर्वाधिक महत्त्वाची व भारतात नवी शैक्षणिक क्रांती घडवून आणण्याची क्षमता असणारी आहे

आज महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेशाचीसरासरी जेमतेम १८ ते २२ टक्के एवढीच आहे. नव्या धोरणात तो ५० टक्क्यांपर्यंत न्यावा, अशी शिफारस आहे. येथे हा प्रश्न आपण साऱ्यांनी विचारला पाहिजे की, एवढे कमी विद्यार्थी महाविद्यालयात का प्रवेश घेतात? त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे उच्चशिक्षण केवळ इंग्रजीत उपलब्ध असणे हे आहेआज देशाच्या ग्रामीण भागात शिक्षणाची बरीच दुरावस्था आहे भारतातील ग्रामीण भागातील गरीब बहुजनांना स्थानिक भाषेतही गुणवत्तापूर्ण शालेय व उच्च शालेय म्हणजे बारावीपर्यंतचे शिक्षण मिळत नाही, ही कटू पण सत्य परिस्थिती आहे. त्यामुळे त्यांचे इंग्रजी हे कच्चे वअर्धेमुर्धे असते. परिणामी विज्ञान-अभियांत्रिकी-वैद्यकीय शिक्षणात रुची व गती असूनही इंग्रजीवर प्रभुत्व नसल्यामुळेअनेक बुद्धिमान तरुण-तरुणी जात नाहीत, हे पण तेवढेच कटू सत्य आहे. म्हणून उच्चशिक्षणातील विद्यार्थ्यांचे प्रमाण इतर देशांच्या तुलनेत बरेच कमी आहे

या पार्श्वभूमीवर या शिफारशचे महत्त्व अधिक आहे. "सर्व भारतीय भाषा, त्यांच्यातील साहित्य-संस्कृती या धोरणामुळे पुन्हा चलनात येईल. एखादी प्रादेशिक भाषा गौण, दुय्यम ठरवली जाणार नाही. संस्कृतला अभिजात भाषा म्हणून शिक्षणात स्थान दिले जाईल यामुळे भारतीय भाषिक परंपरा व सर्व भाषांचे आंतरिक संबंध यांची जाण विद्यार्थ्यांना येऊ शकेलभारतासारख्या बहुभाषिक राष्ट्रात याची अत्यंत गरज आहे. शेवटी सर्व भाषा या ज्ञानाच्या वाहक असल्याचा, म्हणून त्या जोपासण्याचा एक प्रकारचा विश्वास विद्यार्थ्यांमध्ये या धोरणाने येईल."[३]इंग्रजी भाषा हे उच्चशिक्षणाचे माध्यम आहे, ते स्वतः ज्ञान नाही, हे भारतीयांच्या आता नव्या धोरणामुळे लक्षातयेऊ शकेल आणि भविष्यात भारतीय भाषेत उच्च तंत्र-विज्ञानाचे शिक्षण मिळणार म्हणून इंग्रजीत पारंगतता नसल्यामुळे उच्चशिक्षणाकडे आजपाठ फिरवणारे ग्रामीण भागातील बहुजन समाजातील बुद्धिमान तरुण-तरुणी प्रवेश घेतील.

या शिफारशीचे दोन फायदे स्पष्ट दिसतात. एक- महाविद्यालये व विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्यांचा रेशो वाढेल. दोन- मातृभाषेतून वैज्ञानिक व गणितीय संकल्पना व सिद्धान्त अधिक चांगल्या पद्धतीने समजतील-आकळतील. त्यामुळे मूलभूत संशोधानास भरीव चालना मिळू शकेल.

महाराष्ट्र सरकारने पण अलीकडेच मराठी विद्यापीठाला तत्त्वतः मान्यता दिली आहे. हे विद्यापीठ महाराष्ट्रासाठी अत्यंत उपयुक्त ठरेल. मराठी ही ज्ञान-विज्ञानासह आधुनिक उच्चशिक्षणाची आणि रोजगाराची भाषा होण्यासाठी ते महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातून इंग्रजीला हद्दपार न करता उलट अधिक सक्षम करत मराठीचा वैकल्पिक पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे व त्यापुढेही जात द्विभाषिक अध्ययन-अध्यापनाची मुभा अधिकृतपणे देणे, यासाठी हे मराठी विद्यापीठ महत्त्वाची कामगिरी करू शकेल. परिणामी महाराष्ट्राचे तरुण-तरुणी उत्तम प्रभुत्व असणारे द्विभाषिक बनतील.नव्या शैक्षणिक धोरणात भाषा विषयक दृष्टीकोन नक्कीच व्यापक झाला. एकूणच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील भाषाधोरण स्वागतार्ह व स्वीकारार्ह आहे. त्याची सुयोग्य अंमलबजावणी केली, तर महाराष्ट्र देशातील सर्वांत प्रगत राज्य बनेल, हे निःसंशय!

संदर्भ :-


१) देशमुख, लक्ष्मीकांत, नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'तील भाषाधोरण स्वागतार्ह व स्वीकारार्ह आहे. त्याची सुयोग्य अंमलबजावणी केली, तर महाराष्ट्र देशातील सर्वांत प्रगत राज्य बनेल, अक्षरनामा वेब पोर्टल, https://www.aksharnama.com/client/article_detail/5675

२) करमाळकर, नितीन, गोडबोले मंगला(२०२५), नवे शैक्षणिक धोरण,राजहंस प्रकाशन, पुणे, पृ. क्र. २२